माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२२०३४ /२२/अ.क्र.४६९२ /२५

श्री. अल्ताफ दानावाला
रा.३१८, एस.व्ही.रोड, फुट ओव्हर ब्रीजजवळ,
आंबोली नाका, अंधेरी (प), मुंबई-४०००५८.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी पूर्व उपनगरे
यांचे कार्यालय,दुसरा मजला, महापालिका मुख्यालय,विस्तारित इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई – ४००००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी
(सर्वसाधारण) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,दुसरा मजला, महापालिका मुख्यालय,
विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, मुंबई – ४००००१.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०२.२०२२ | ०२.०३.२०२२ | ०६.०४.२०२२ | ११.०४.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकनावरून तत्कालीन अपिलिय अधिकाऱ्यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात या आधीच अपिलकर्त्यांनी अपेक्षिलेली पाचशे पृष्ठांपर्यंतची माहिती नि:शुल्क उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले असून अपिलार्थीनी विचारणा केलेल्या माहिती संबंधीची धारिणी ही कार्यालयात उपलब्ध असून अपिलार्थीनी संपर्क साधल्यास त्यांना आवश्यक माहिती विनाशुल्क पुरवण्यात येईल असे लेखी व मौखिक युक्तीवादात नमूद करण्यात आले आहे.

अपीलार्थीनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जात त्यांच्या जोडपत्रामधील नमूद माहिती त्यांना देण्याचे तसेच ती माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आक्षेप नोंदविला असून आज झालेल्या सुनावणीत अपीलार्थी ऑनलाईन पद्धतीने हजर असले तरी तांत्रिक कारणामुळे त्यांचा आवाज तसेच व्हिडिओ ऐकू आलेला नाही.

jyotsna

कार्यासनात उपलब्ध असलेली धारिणी ही साधारणपणे १००० पृष्ठांपर्यंतची असून ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती ही याआधीच अपीलार्थींना अवलोकन करून प्रदान करण्याचे निर्देश अपिलिय अधिकारी स्तरावर देण्यात आले असून अपिलार्थींनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याशी तसेच सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, के/पश्चिम यांच्याशी संपर्क व समन्वय साधून कार्यालयात उपलब्ध धारणीचे निरीक्षण करून त्यातील ५०० पृष्ठांपर्यंतची उपलब्ध असलेली माहिती ही **विनामूल्य** व त्यानंतरची माहिती ही सशुल्क प्राप्त करून घेण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२.अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०१-२०२६**

State Information Commission ★ Maharashtra ★

jyotsna